सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- controlroompune@gmail.com

जावक क्र. आ.व्य.प्रा./519/2021 दिनांक:- 11/04/2021

वाचले :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

**विषय:- जिल्हास्तरीय Remedisivor टंचाईबाबत नियंत्रण कक्ष प्रमुख नियुक्ती बाबत.**

**संदर्भ:- 1. मा.आयुक्त अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्रमांक अन्ना/Remedisivr /२४-२१/१ दिनांक १०/४/२१ चे पत्र**
**2. या कार्यालयाकडील जा क्र. जि.आ.व्य/कावि/517 व 518/21 दि. 11/4/2021 रोजीचा आदेश.**

**आदेश**

**ज्याअर्थी,** मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई यांचेकडील No.DMU/2020/CR PRADHM-२, दि.29/06/2020 रोजीच्या आदेशामध्ये त्या त्या जिल्ह्यातील परिस्थिती प्रमाणे संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना जिल्हयातील रुग्ण स्थितीनुसार आदेश काढणेबाबत सर्वाधिकार देणेत आलेले आहेत. आपती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील तरतुदी प्रमाणे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारण हे कोणतीही आपत्ती रोखण्यासाठी किंवा आपत्ती विरुध्द प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत.

**ज्याअर्थी,** कोविड-१९ विषाणूचा संसर्गाचा प्रादुर्भाव व वाढत असलेली रुग्ण संख्या विचारात घेता **Remedisivor** इंजेक्शन चा पुरवठा सुरळीत होण्यासाठी त्याचा काळाबाजार व साठेबाजी रोखण्यासाठी त्याची विक्री व वितरण नियंत्रीत करणे अत्यंत आवश्यक आहे.त्यासाठी वरील संदर्भीय पत्रान्वये नियंत्रण कक्ष स्थापन करण्याच्या सूचना प्राप्त झाले आहे.त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियत्रण कक्ष **दिनांक ११/०४/२०२१ ते ३१/०५/२०२१** पर्यंत २४ तास कार्यरत करणेत आलेला आहे.

**त्याअर्थी, मी डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पुणे जिल्हास्तरीय Remedisivor टंचाईबाबत नियंत्रण कक्ष प्रमुख तथा Incident Commander व सहाय्यक कक्ष तथा Asst Incident Commander प्रमुख म्हणून खालील अधिका-यांची नियुक्ती करित आहे.**

| अ.क्र | नियंत्रण कक्ष प्रमुखाचे नाव | पदनाम | कार्यालयाचे नाव | करावयाचे कामकाज |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. एस.व्ही. प्रतापवार मोबा .९९८७४२५८५९ | सहाय्यक आयुक्त, परिमंडल -४, अन्न व औषध प्रशासन | अन्न व औषध प्रशासन पुणे | **Remedisivor** टंचाईबाबत नियंत्रण कक्ष प्रमुख तथा Incident Commander |
| २ | श्री. प्रशांत पिसाळ मोबा नं.९१५८५२३१९९ | तहसिलदार निवडणूक | जिल्हाधिकारी कार्यालय पुणे | सहाय्यक कक्ष प्रमुख तथा Asst. Incident Commander |

१) उपरोक्त नमूद अधिकारी यांनी कोविड-१९ च्या उपाययोजनांच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यात सर्व कोविड-१९ आस्थापनांना रेमेडिसीवीर इंजेक्शनचा पुरवठा सुरळीत होण्याच्या अनुषंगाने सर्व रेमेडिसीवीर इंजेक्शन उत्पादक कंपन्या, सर्व रेमेडिसीवीर इंजेक्शन पुरवठा करणारे स्टॉकीस्ट यांचेशी समन्वय करून आवश्यक ती कार्यवाही करावी.

Scanned with CamSca

२) नियंत्रण कक्षात नेमणूक करणेत आलेले अधिकारी व कर्मचारी यांचे सनियंत्रण करणे. व भरारी पथकास अचानक कोविड-१९ आस्थापनांना व रेमेडिसीवीर इंजेक्शन पुरवठा करणारे स्टॉकीस्ट यांची तपासणी करणेबाबतचे कामकाज करून घेणे.

३) सदर नियुक्त अधिकारी यांनी आपली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी. तसेच उपरोक्त नियुक्त अधिकारी यांनी आपले अधिनस्त असलेला मनुष्यबळ व साधन सामुग्रीचा यथोचित वापर करुन सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडावी.

जिल्हाधिकारी पुणे

(डॉ.राजेश देशमुख)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे**

**प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सादर:-**

१. मा. विभागीय आयुक्त, विधान भवन, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.आयुक्त पुणे शहर व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
३. मा. पोलीस आयुक्त पुणे शहर व पिंपरी चिंचवड आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त पुरविणेसाठी सविनय सादर
४. पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त पुरविणेबाबत कार्यवाही करावी.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
६. आरोग्य अधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा परिषद पुणे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
७. सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
८. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
९. सर्व संबधित अधिकारी व कर्मचारी

Scanned with CamSca